अपर पोलीस आयुक्त,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग यांचे कार्यालय,
९१, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई – ४०००३०.
दुरध्वनी क्र. २४९२१२१२ (विस्ता),
Email- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in
दिनांक :– २०.०४.२०२३

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक व दाखल दिनांक | १९/२०२३ |
| कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ |
| आरोपी लोकसेवक | श्री. रणजितसिंग कोमलसिग राजपुत, वय ५६ वर्षे, धंदा-सहाय्यक दुग्धशाळा व्यवस्थापक (वर्ग-२), कार्यालय - आरे दुग्धशाळा, वरळी, मुंबई (अतिरिक्त कार्यभार -नियंत्रक गुरे नियंत्रण कार्यालय, गोरेगांव, मुंबई) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये १०,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये ७,०००/- |
| हस्तगत लाचेची रक्कम | रुपये ७,०००/- |
| थोडक्यात माहिती | यातील फिर्यादी हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असुन, त्यांना सेवानिवृत्ती नंतर मिळणाऱ्या लाभाच्या रक्कमेसाठी महालेखा कार्यालय येथे पाठविण्यात येणाऱ्या कागदपत्रांच्या प्रक्रियेकरीता यातील आलोसे यांनी फिर्यादी यांच्याकडे लाचेची मागणी केली होती. त्यानंतर दिनांक १७/०४/२०२३ रोजी फिर्यादी यांना आलोसे यांनी कार्यालयात बोलावुन कागदपत्रांवर सही करुन महालेखा कार्यालयात कागदपत्रे पाठवित असल्याचे सांगुन, त्या मोबदल्यात रु. १० हजार च्या लाचेची मागणी केली. फिर्यादी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे समक्ष हजर राहून लेखी तक्रार दिली.<br><br>फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक १९/०४/२०२३ रोजी पंचासमक्ष केलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांना २०/०४/२०२३ रोजी लाचेची रक्कम घेवुन येण्यास सांगितले होते. त्याप्रमाणे दिनांक २०/०४/२०२३ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी/सापळा कारवाईदरम्यान आलोसे यांनी तडजोडीअंती रु. ७ हजार लाचेची मागणी करुन ती स्विकारली म्हणून आलोसे यांच्याविरुध्द कलम ७ भ्र. प्र. अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. |

**मार्गदर्शन अधिकारी :- श्री. विजय पाटील सो, अपर पोलीस आयुक्त, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग.**

20/4/23

( संजय पाटील )
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन),
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
मुंबई विभाग, मुंबई.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई बृहन्मुंबई विभागा तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या आलोसेबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग, ९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२-२४९२१२१२, फॅक्स क्र. ०२२-२४९२२६१८
वेबसाईट :- acbmaharashtra.gov.in, ईमेल :- acbwebmail@mahapolice.gov.in
ईमेल :- addlcpacbmumbai@mahapolice.gov.in, मोबाईलॲप :- www.acbmaharashtra.net
फेसबुक :- www.facebook.com - Maharashtra ACB